७९५७१४५

जा. क्र. प्राशि/प्राशि/खाप्राशा/परवानगी/त्रुटी/०६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक:- 29 APR 2006

प्रति,

प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका, शिक्षण मंडळ, पिंपरी-चिंचवड.

विषय :- त्रुटींची पूर्तता करून घेणे [ २००६-०७ इंग्रजी ]

संस्थेचे नांव पत्ता- श्री संत सावतामाळी शिक्षण संस्था, मोशी, ता-हवेली.

संदर्भ :- आपणाकडील पत्र क्र. खाप्राशा/२००४/२००६, दि. ८/३/२००६

आपले उपरोक्त संदर्भिय पत्र अवलोकनी घ्यावे.

या पत्रान्वये आपण या कार्यालयास सादर केलेल्या तपासणी अहवालाचे अवलोकन करता असे दिसते की, सदर तपासणी अहवालात खालील त्रुटी दिसून येत आहेत. सदर त्रुटींची संबंधित संस्थेकडून पूर्तता करून घेऊन अहवाल या कार्यालयास विनाविलंब सादर करावा. त्यानंतरच संबंधित संस्थेच्या खाजगी प्राथमिक शाळेस प्रथम परवानगी देणेबाबतचा विचार करता येईल.

१] शाळेत प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमलेला नाही.
२] शाळेचे इमारत भाडे करार ज्यांनी केला आहे त्यांच्या व मालकीची जागा असल्याबद्दल ७/१२, करपावती इ. माहिती.
३] शाळेत आपत्कालीन घटना घडल्यास प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्याची माहिती दिली नाही.
४] शाळेत सर्व शैक्षणिक व भौतिक सुविधा असल्याची माहिती नाही.
५] संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी नाही.

स्थळप्रतीवर मा. शि. उ. सं.
यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत माहिती व तात्काळ कार्यवाहीसाठी-

मा. अध्यक्ष/मा. सचिव,

श्री. संत सावतामाळी शिक्षण संस्था, मोशी, ता-हवेली, जि-पुणे.

